# महाराष्ट्र शासन

E-mail id : sd4.sesd-mh@gov.in

क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२२७/एसडी-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २५ नोव्हेंबर,२०२२.

प्रति,
आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य,पुणे,

**विषय** :- सलाम मुंबई फाऊंडेशन निर्मित Tobacco Free School App वर राज्यातील सर्व शाळांनी तंबाखूमुक्त शाळांच्या ९ निकषांची माहिती पुरविणेबाबत.

**संदर्भ** :- विश्वस्थ,सलाम मुंबई फाऊंडेशन,मुंबई यांचे दिनांक १२.१०.२०२२ चे पत्र.

महोदय,

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०९.२०२२ रोजी राज्यस्तरीय तंबाखू नियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार आणि मा.मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार सलाम मुंबई फाऊंडेशन करीत असलेल्या सर्व जिल्ह्यातील शाळांनी Tobacco Free School App वर तंबाखू मुक्त शाळांची माहिती व पुरावे भरावेत याकरिता सलाम मुंबई फाऊंडेशनने Tobacco Free School App कार्यान्वित करण्याकरिता अर्ज सादर करावा असे सूचविण्यात आले होते.

२. वरील विषयाचा संदर्भ घेऊन सलाम मुंबई फाऊंडेशन मार्फत Tobacco Free School App कार्यान्वित व संमती नंतर राज्यातील सर्व शाळांना Tobacco Free School App ची लिंक पाठविण्यात येईल असे सांगण्यात आले होते. त्याअनुषंगाने शालेय शिक्षण विभागाकडून राज्यातील सर्व शाळांना सलाम मुंबई फाऊंडेशन निर्मित Tobacco Free School App वर तंबाखूमुक्त शाळांच्या ९ निकषांचे योग्य पुरावे सर्व शाळांनी अपलोड करावेत असे ठरविण्यात आले. सर्व शाळांनी निकषांचे पुरावे अपलोड केल्यानंतर त्याची तपासणी सलाम मुंबई फाऊंडेशन आणि जिल्हा शिक्षण विभाग यांच्यामार्फत केली जाईल आणि निकष पूर्ण आहेत याची खात्री झाल्यानंतर त्या शाळांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येईल.

३.	त्याअनुषंगाने सदर पत्रामध्ये सूचविल्याप्रमाणे सलाम मुंबई फाऊंडेशन निर्मित Tobacco Free School App वर राज्यातील सर्व शाळांनी तंबाखूमुक्त शाळांच्या ९ निकषांची माहिती पुरविणेबाबत राज्यातील सर्व शाळांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे, ही विनंती.

आपली,

( मृणाली काटेंगे )
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी,

विश्वस्थ,सलाम मुंबई फाऊंडेशन,मुंबई

(672/22)/एसडी-4
17.11.2022

9 14.वि

SALAAM MUMBAI FOUNDATION

दिनांक : १२ /१०/२०२२

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
कार्यासन क्र. SD4
दि. 13 OCT 2022
जावक क्र. 5470742
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रति,

मा. शिक्षण सचिव,

(शालेय शिक्षण-महाराष्ट्र)

महाराष्ट्र राज्य

**विषय** - तंबाखू मुक्त शाळा - महाराष्ट्र राज्य - फेब्रुवारी २०२३ च्या ध्येयपूर्तीसाठी सलाम मुंबई फाऊंडेशन निर्मित Tobacco Free School App वर महाराष्ट्रातील सर्व शाळांनी तंबाखूमुक्त शाळांच्या ०९ निकषांची माहिती पुरविणे बाबत.

**संदर्भ** : दिनांक ३०/०९/ २०२२ रोजी मा. मुख्य सचिव साहेब महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तंबाखू नियंत्रण समितीची घेण्यात आलेली सभा.

**मा. महोदय,**

तंबाखूमुक्त शाळा महाराष्ट्र राज्याच्या पूर्तीसाठी आपण देत असलेल्या सहकार्या बद्दल आपले सलाम मुंबई फाऊंडेशन तर्फे खूप खूप आभार.

दिनांक ३०/०९/ २०२२ रोजी मा. मुख्य सचिव साहेब महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तंबाखू नियंत्रण समितीची सभा मंत्रालयात घेण्यात आली. या सभेत झालेल्या चर्चेनुसार आणि मा. मुख्य सचिव साहेबानी दिलेल्या निर्देशानुसार सलाम मुंबई फाऊंडेशन करीत असलेल्या सर्व जिल्ह्यातील शाळांनी Tobacco Free School App वर तंबाखू मुक्त शाळांची माहिती व पुरावे भरावेत याकरिता सलाम मुंबई फाऊंडेशनने Tobacco Free School App कार्यान्वित करण्या करीता अर्ज सादर करावा असे सुचविण्यात आले होते.

वरील विषयाचा सन्दर्भ घेऊन सलाम मुंबई फाऊंडेशन मार्फत Tobacco Free School App कार्यान्वित व संमती नंतर महाराष्ट्रातील सर्व शाळांना Tobacco Free School ची लिंक पाठविण्यात येईल.

शिक्षण विभाग कडून सर्व शाळांना सूचना देण्यात याव्यात कि सर्व शाळांनी सलाम मुंबई फाऊंडेशन निर्मित Tobacco Free School App वर तंबाखू मुक्त शाळांच्या ०९ निकषांचे योग्य पुरावे अपलोड करावेत.

please put up
ASO Mr. Chavhan
9/11

Registered Office : 1st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai 400 021
Tel.: (91-22) 6149 1900 / 6693 1500
E-mail : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

'Registered under the Bombay Public Trust Act 1950 vide No. E-27122 (Mum) dated 05-07-2010'

SALAAM MUMBAI FOUNDATION

सर्व शाळांनी निकषांचे पुरावे अपलोड केल्यांनतर त्याची तपासणी सलाम मुंबई फाऊंडेशन आणि जिल्हा शिक्षण विभाग यांच्या मार्फत केली जाईल आणि निकष पूर्ण आहेत ह्याची खात्री झाल्यांनतर त्या शाळांना ओनलाइन प्रमाणपत्र मिळेल.

सर्व शाळांनी जानेवारी २०२३ अखेर पर्यंत Tobacco Free School App वर तंबाखू मुक्त शाळांच्या ०९ निकषांचे योग्य पुरावे अपलोड करावेत. यांनतर सर्व शाळांनी भरलेली माहिती आणि पुरावे तपासले जातील आणि४फेब्रुवारी २०२३ मौखिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य हे तंबाखूमुक्त शाळांचे पहिले राज्य म्हणून घोषित करण्यात येईल. सर्व शाळा ह्या ऍप वर आल्यानन्तर जिल्हा निहाय अहवाल तयार केला जाईल आणि जिल्हा आणि राज्यस्तरावर हा अहवाल सुपूर्द केला जाईल. शिक्षण विभागाच्या सहमतीने राज्यस्तरावर नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेण्यात येईल ज्याठिकाणी तंबाखूमुक्त शाळांचे महाराष्ट्र राज्य म्हणून घोषित केले जाईल.

सलाम मुंबई फाउंडेशन २००७- ०८ सालापासून महाराष्ट्रात शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, आदिवासी कल्याण मंत्रालयांसोबत सर्व शाळा तंबाखूमुक्त व्हाव्यात यासाठी कार्य करीत आहे. आजमितीस तंबाखूमुक्त शाळा कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील **१६२५६२** शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले असून **५९३** सेवाभावी संस्था देखील या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत. **१२१२१** डीएड आणि बीएड विद्यार्थी, **१५४३९** पोलीस देखील प्रशिक्षित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात आजपर्यंत एकूण **३८७४८** शाळा तंबाखू मुक्त झालेल्या आहेत. याचे सर्व श्रेय शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि अधिकारी वर्गास जाते. शिक्षण विभागाच्या सहकार्य शिवाय हे लक्ष्य साध्य करणे अशक्य होते. महाराष्ट्रातील यशानंतर आता सलाम मुंबई फाऊंडेशनने भारतातील **१०** राज्यांत तंबाखूमुक्त शाळांचे काम स्थानिक शासनासोबत सुरू केले आहे.

आपण केलेल्या सूचनेनुसार संदर्भित पत्र आपल्या संमतीकरिता सादर करत आहोत. आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत

धन्यवाद,

Kadam

राजश्री कदम

विश्वस्थ (सलाम मुंबई फाऊंडेशन)

Registered Office : 1st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai 400 021
Tel.: (91-22) 6149 1900 / 6693 1500
E-mail : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

'Registered under the Bombay Public Trust Act 1950 vide No. E-27122 (Mum) dated 05-07-2010'